*ताडोब्यातील वाघीण मृत्य प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आदेश*

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील ताडोबा वनपरिक्षेत्रातील कोअर झोन मध्ये वाघिणीच्या झालेल्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत.

ही घटना अतिशय गंभीर असून ज्या तारांमुळे वाघीण दगावली त्या तारा कोणी लावल्या ह्याचा कसून तपास करावा व चौकशीअंती दोषींवर कडक कारवाई करावी असे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये ह्या दृष्टीने खबरदारी घेण्यात यावी असेही त्यांनी म्हटले आहे.